# माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन,
# मंत्रालय, मुंबई-४०००३२
## महासंचालनालयातील अखत्यारित असलेल्या सी.सी.आय
## गोदामाची दुरुस्ती करण्याकरीता
## दरपत्रक नमुनाफॉर्म

अनुक्रमांक :-

१. दरपत्रक क्रमांक-लेसाभां/२०२५/ सी.सी.आय गो. येथे गो.दुरुस्ती/दरपत्रक/का-१/ ९६३ दिनांक २८/५/२०२५

२. दरपत्रक जमा करण्याचा **दिनांक ३/६/२०२५** दुपारी ३.३० वाजता

३. दरपत्रक उघडण्याचा शेवटचा **दिनांक ४/६/२०२५** सकाळी ११.०० वाजता

४. दरपत्रक कालावधी **(सहा महिन्यांसाठी)**

महासंचालनालयाच्या अखत्यारित असलेले सी.सी. आय.क्लब येथील गोदामची दुरुस्ती करण्याकरिता दरपत्रक सादर करीत आहे. या दरपत्रकाबाबतच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

एकूण रक्कम रु 40,500/- (सर्व करासंहित)

| अ.क्र | पोर्टा केबीनची चौ. फूट | दुरुस्ती करणे आवश्यक | दुरुस्ती/ नवीन पोर्टा केबीन खरेदी करण्याकरिता लागणारी अंदाजित किंमत |
|---|---|---|---|
| १ | ५१२ स्क्वे. फूटाची एक कॉंक्रिट केबीन | छताचे पत्रे दुरुस्त | 27,000/- |
| २ | | दरवाजा दुरुस्त करणे | 13,500/- |

## अटी व शर्ती

१. मोहोरबंद लिफाफ्यावर माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील, सी.सी. आय.क्लब येथील गोदामची दुरुस्ती दरपत्रक असे लिहिणे आवश्यक आहे.

२. चांगल्या प्रतीचे पत्रे व दरवाजाकरिता चांगल्या प्रतीचे लोखंड याचा वापर करणे आवश्यक राहिल.

३. दरपत्रक फॉर्ममध्ये नमूद करण्यात आलेले रक्कम ही सर्व करासंहित असेल.

४. कोणत्याही अपरिहार्य कारणामुळे दरवाढ झाल्यास दरपत्रकधारकांनी दरपत्रकामध्ये सादर केलेल्या दरामध्ये कोणत्याही प्रकारची दरवाढ करुन देण्यात येणार नाही.

५. दरपत्रक सोबतच्या विहित नमुनाफॉर्मध्ये सादर करण्यात येऊन दरपत्रकावर दरपत्रकधारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक आहे.

६. सी.सी. आय.क्लब येथील गोदामाची दुरुस्ती केल्यानंतर त्यासंबंधीची देयके आगाऊ मुद्रांक पावतीसह सादर करावे. देयके प्राप्त झाल्यापासून तीन महिन्यात (९० दिवस) बिलाची रक्कम ECS सेवेद्वारे परस्पर खात्यात जमा करण्यात येईल. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

७. एकूण अंदाजित रक्कमेच्या २० टक्क्यांपेक्षा कमी आणि १० टक्क्यांपेक्षा जास्त रकमेचा देकार देता येणार नाही.

८. दुरुस्तीमध्ये एखादी बाब कमी झाल्यास त्यानुसार दर आकारण्यात येईल.

९. सर्व काम एकाच संस्थेला देण्याला माहिती व जनसंपर्क महासंचालनालय बांधिल नसेल.

१०.सदर दरपत्रक माहिती व जनसंपर्क महासंचालनाल्याच्या dgipr.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

११.दुरुस्त करुन देण्यात येत असलेल्या केबीनची किमान ६ महिन्यांची वॉरंटी राहील.

**दरपत्रकधारकाची स्वाक्षरी व शिक्का**

**नाव** ----------------------------

**पूर्ण पत्ता** ----------------------------